श्री व्यंकटेश महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

" बौद्धिक विकासाबरोबर शारीरिक विकास देखील महत्वपूर्ण असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबर खेळामध्ये देखील यश मिळवणे तितकेच गरजेचे आहे." असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए.माने यांनी केले ते महाविद्यालयातील दोन विद्यार्थ्यांची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल त्यांच्या सत्कार कार्यक्रमाप्रसंगी बोलत होते.

के. आय.आय. टी. स्वायत्त विद्यापीठ, भुवनेश्वर या ठिकाणी होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तिरंदाजी स्पर्धेसाठी महाविद्यालयातील कुणाल प्रवीण फाटक याची शिवाजी विद्यापीठ संघामध्ये निवड झाली. तसेच एस.आर.एम. इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स टेक्नॉलॉजी, चेन्नई या ठिकाणी होणाऱ्या अखिल भारतीय जलतरण स्पर्धेसाठी अथर्व सतीश पाटील याची शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर या संघामध्ये निवड झाली. महाविद्यालयातील या विद्यार्थ्यांनी हे मिळवलेले यश खरोखरच कौतुकास्पद आहे असे मत महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक श्री. अमीन बाणदार यांनी केले. या यशाबद्दल महाविद्यालयामार्फत त्यांच्या सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे प्रेसिडेंट श्रीनिवासजी बोहरा, चेअरमन श्रीकृष्ण बोहरा, व्हाईस चेअरमन उदय लोखंडे,सचिव बाबासाहेब वडिंगे , महाविद्यालयाचे प्राचार्य, शारीरिक शिक्षण संचालक व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे कडून त्यांचे अभिनंदन करण्यात आले.



कुणाल प्रवीण फाटक



अथर्व सतीश पाटील